# सामान्य प्रशासन विभाग जिल्हा परिषद धाराशिव

Email-dyceo.gaddharashiv@gmail.com Tel- 02472-223388

जा.क/जिपधा/साप्रवि/ने-4/अंकपा/ 789/2024 दि. 30/09/2024

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी,
मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, धाराशिव

विषय- अनुकंपा भरतीसाठी उमेदवारांना आवाहन करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणे बाबत

उपरोक्त विषयी आपणास कळविण्यात येते की, अनुकंपा भरती प्रकियेबाबत कागदपत्राची पडताळणी करणेसाठी दिनांक- 04.10.2024 व 05.10.2024 रोजी सकाळी 11.00 वाजता जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सभागृह, जिल्हा परिषद धाराशिव येथे कॅम्प आयोजित करण्यात आलेला आहे.

तरी या बाबत उमेदवारांना आवाहन करणेसाठी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द करणेसाठी सोबत प्रेस नोट दिलेली आहे. तरी सदर प्रेस नोटची प्रसिध्दी सर्व वर्तमानपत्रामध्ये देण्यात यावे ही विनंती.

सोबत- प्रेस नोट.

(सुर्यकांत भुजबळ)
उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा)
जिल्हा परिषद धाराशिव

# प्रेस नोट

# अनुकंपा भरती बाबत उमेदवारांना आवाहन

शासन निर्णय दिनांक- 22 डिसेंबर 2021 नुसार अनुकंपा धारक उमेदवारांना नियुक्ती देण्याचे प्रस्तावित आहे. त्यानुसार अनुकंपा उमेदवारांची प्रतिक्षायादी जिल्हा परिषद धाराशिव च्या www.zposmanabad.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे.

यामध्ये यादीतील अ.क्र -01 ते 80 मधील नमुद उमेदवारांची अनुकंपा भरती प्रकियेसाठी मुळ कागदपत्रांची पडताळणीसाठीचा कॅम्प दिनांक- 04.10.2024 ते 05.10.2024 या कालावधीत सकाळी 11.00 पासुन जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा सभागृह जिल्हा परिषद धाराशिव येथे आयोजित करण्यात आलेला आहे.

करीता जिल्हा परिषद धाराशिव अंतर्गत अनुकंपा प्रतिक्षायादीवरील उमेदवारांना याद्वारे आवाहन करण्यात येते की, त्यांनी कागदपत्र पडताळणीसाठी खालील दिनांकास नमुद केल्याप्रमाणे त्यांचे शैक्षणिक व इतर मुळ कागदपत्रासह वेळेवर उपस्थित राहावे, त्याचप्रमाणे मुळ कागदपत्र सादर केली असल्यास सादर केलेली पोहोच व कागदपत्राची सत्यप्रतीसह उपस्थित राहावे.

| दिनांक | अनुकंपा जेष्ठता यादीतील क्रमांक | शेरा |
|---|---|---|
| 04.10.2024 | 1 ते 50 | |
| 05.10.2024 | 51 ते 80 | |

नेमून दिलेल्या दिवशी अनुकंपाधारक उमेदवार उपस्थित न राहिल्यास अथवा उपस्थित राहून कागदपत्रांची पुर्तता न केल्यास प्रतिक्षायादी प्रमाणे सदर उमेदवाराचा अनुकंपा नियुक्तीसाठी विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी. या अनुषंगाने उमेदवारांना अनुकंपा तत्वावर नोकरीसाठी अर्ज केलेल्या पत्त्यावर कागदपत्राच्या पडताळणीसाठी पत्रव्यवहार रजिस्टर पोस्टाने केलेला आहे.

तरी उमेदवारांनी दिलेल्या पत्यावरून पत्र प्राप्त करून घ्यावे, असे आवाहन मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद धाराशिव यांचे वतीने करण्यात येत आहे.

उप मुख्य कार्यकारी अधिकारी (सा.)
जिल्हा परिषद उस्मानाबाद